करोना २०२०/सूचनां/आदेश क्र. १५४

**महाराष्ट्र शासन**

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग**

दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१

Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.३०/०३/२०२०

**वाचले:-** १) तहसिलदार महाड यांचेकडील पत्र क्र.फौजदारी/कात-१०/विलगीकरण कक्ष/२० दि.२३/०३/२०२०.

२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५

३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य-५ दि.१३/०३/२०२०.

४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, १८९७ ची नियमावली दि.१४/०३/२०२०

५) साथ रोग अधिनियम १८९७.

६) या कार्यालयाकडील समक्रमांकाचे आदेश दि.२३/०३/२०२०.

---

**सुधारीत आदेश**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० लागू केला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.३ कडील अधिसूचना लागू करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, उपोद्घातातील अनु.क्र.६ कडील आदेशान्वये महाड तालुका पोलिस ठाणे अंतर्गत बांधण्यात आलेल्या निवासी संकुल इमारतीसह इमारतीमधील उपलब्ध सर्व संसाधने बाहेरील देशातून आलेल्या तसेच त्यांच्या संपर्कात आलेल्या नागरीकांसाठी अलगीकरण कक्ष (Quarantine Cell) म्हणून अधिग्रहीत करण्यात आलेले आहे.

त्याअर्थी मी, श्रीम.निधी चौधरी, जिल्हाधिकारी रायगड तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड मला महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, १८९७ ची नियमावली दि.१४/०३/२०२० कडील नियम १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शासकीय किंवा खाजगी इमारत/मत्ता विलगीकरणासाठी आवश्यकतेनुसार नामनिर्देशित करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. त्याचा वापर करुन सद्यस्थितीत कोरोनाग्रस्त रुग्ण विलगीकरण कक्षात (Isolation Cell) मध्ये ठेवण्याची आवश्यकता लक्षात घेता वर नमूद महाड तालुका पोलिस ठाणे अंतर्गत बांधण्यात आलेल्या निवासी संकुल इमारतीसह इमारतीमधील उपलब्ध सर्व संसाधने विलगीकरण कक्ष (Isolation Cell) म्हणून अधिग्रहीत करण्याचे आदेश देत आहे.

तहसिलदार महाड यांनी सदर इमारती व इमारतीमधील उपलब्ध सर्व संसाधने तात्काळ अधिग्रहीत करुन ताब्यात घ्यावीत. सदरचे कार्य पूर्ण झाल्यानंतर अधिग्रहीत केलेल्या सर्व खोल्या व इतर संसाधने निर्जंतुकीकरण करुन संबधितांस सुस्थितीत परत करावीत.

सदर आदेशास तात्काळ अंमल देण्यात यावा.

(निधी चौधरी)

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**

**रायगड-अलिबाग**

प्रति,

१) उपविभागीय अधिकारी महाड, तहसिलदार महाड यांना तात्काळ (Isolation Cell) स्थापन करण्याकरीता.

२) उपविभागीय पोलिस अधिकारी महाड, पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, महाड यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner